July-2024

(06)

E- 2308050

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 06 मा.अ.
दिनांक: 10/7/2024

पहा नियम ६ (१)

महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५

प्रती,
मा. विधी अधिकारी
विधी विभाग
मिरा- भाईंदर महानगरपालिका




अर्जदाराचे नाव — फिरोज खान

पत्ता — फिरोज लतीफ खान चाल, गावंदेवी डोंगरी,कामा रोड, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०००५८

मोबाईल नं — ९८१९१६३२८८/९३२३४०४४४९

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : जावक क्र. मिभा/मनपा/नर/७५१४/१८- १९ या बांधकाम परवानगी आणि आर. सी. एस. ५७९/२०१९ संदर्भात खालील माहिती मिळणे बाबत

१ या बांधकाम परवानगी संदर्भ मा. न्यायालय. ठाणे आणि मा. उच्च न्यायालय मुंबई इथे किती केस चालू आहेत याची लेखी माहिती

२ या बांधकाम परवानगी विषयी दोन्ही न्यायालय द्वारा (जैसे थे आदेश STAY ORDER) आज पर्यन्त आहे की नाही याची लेखी माहिती

३ या बांधकाम परवानगी विषयी दोन्ही न्यायालयाचा आजची स्थिती विवरण आणि सर्व आदेशाची कॉपी देण्यात यावी.

माहितीचा संबंधित काळावधी — संबंधीत कालावधी

माहितीचा टपालादवरे की व्यक्तश आवश्यक आहे. — व्यतिक्तश

ज्यासाठी माहितीचा आवश्यक आहे ते प्रयोजन : स्व:ताची माहिती करीता

ठिकाण : मिरा रोड

दिनांक : ०८/०७/२०२४

श्री. फिरोज खान

Mail. ID:- khanfirozfk78654@gmail.com

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०६/२०२४-२५
दि. ०७/०८/२०२४

**प्रति,**

श्री. फिरोज खान
फिरोज लतीफ खान चाळ, गावदेवी डोंगरी,
कामा रोड, अंधेरी (प) मुंबई 400058

**विषय :- केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 अन्वये अर्ज**

**संदर्भ** :- आपला दि. 08/7/2024 रोजीचा अर्ज

संदर्भिय अर्जान्वये आपण माहिती अधिकारान्वये अर्ज करून जाक्र.मनपा/नर/7514/2018-19 या बांधकाम परवानगी आणि आर. सी. एस. 579/2019 संदर्भात मुद्दा क्र. 1 ते 3 अन्वये माहिती अपेक्षिली आहे. तरी सदर मुद्दा क्र. 1 ते 3 बाबत खालीलप्रमाणे माहिती देत आहे.

जाक्र.मनपा/नर/7514/2018, दि. 30/03/2019 अन्वये मे. रवी डेव्हलपमेंट्स व इतर यांना दिलेली सुधारीत रेखांकनासह सुधारीत बांधकाम परवागनी मनपाने जाक्र.मनपा/नर/1335/2019-20, दि. 17/06/2019 रोजी रद्द केल्याच्या आदेशाविरुद्ध वादी श्री. शैलेश शहा यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे संदर्भिय दावा दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदर दाव्यात दि. 17/07/2019 रोजी मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश पारीत केले होते.

Defendant hereby restrained for taking coercive or forcible steps in respect of suit property on the basis of order dt. 17.06.2019 of Commissioner of corporation till filing of say or next date which is leter.

सदरचे आदेश मा. न्यायालयाने वेळोवेळी वाढवून दिले होते. दरम्यानच्या काळात मे. रवि डेव्हलपमेंट्स यांनी दि. 17/06/2019 रोजीच्या आदेशाविरुद्ध मा. नगरविकास मंत्री यांच्याकडे देखिल अपिल दाखल केले असता मा. नगरविकास मंत्री यांनी खालीप्रमाणे आदेश पारीत केले.

1. अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे.

2. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे दि. 17/06/2019 चे आदेश तक्रारीमध्ये नमुद नसलेल्या अर्जदारांच्या/विकासकाच्या जमिनीपुरते रद्द करण्यात येत आहेत. मात्र तक्रार असलेल्या जमिनीबाबत सदर आदेश कायम राहतील.

3. अर्जदार/विकासकचे उपरोक्त अ. क्र. 2 मध्ये नमुद तक्रार नसलेले क्षेत्र व त्या क्षेत्राच्या हद्दी लक्षात घेऊन त्यांनी मनपास सुधारीत प्रस्ताव सादर करावा व या प्रस्तावावर मनपाने 15 दिवसांच्या आत प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीच्या अधिन राहून मंजूरी देण्याची कार्यवाही गुणवत्तेवर करावी.

4. तक्रारदारांनी नमुद केलेल्या जमिनीबाबत विकासक व तक्रारदारांनी योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाद मागावी.

वरीलप्रमाणे मा. मंत्री नगरविकास विभाग यांनी आदेश पारीत केल्याचे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानुसार मा. न्यायालयाने संदर्भिय दाव्यातील दि. 17/07/2019 रोजीचे जैसे थे आदेश वाढवून दिलेले नाहीत. सद्यस्थितीत मा. मंत्री नगरविकास विभाग यांनी पारीत केलेले आदेश अस्तित्वात आहेत.

तसेच सदर जागेसाठी देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीबाबत याचिकेदार मे. रवि डेव्हलपमेंट यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 7420/2022 दाखल केली होती. सदरची याचिका दि. 10/1/2023 रोजी निकाली काढण्यात आलेली आहे. तसेच नव्याने दाखल झालेली रिट याचिका क्र. 2940/2024 याचिका मा. उच्च न्यायालयात सद्यस्थितीत प्रलंबित आहे.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास सदरचे पत्र मिळाल्यापासून 30 दिवसांत श्री. सचिन बांगर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी), चौथा मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय यांच्याकडे अपिल दाखल करता येईल.

Swnadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

16/8/2024